दि. १६ ऑक्टोबर, २०२५

# जाहीर प्रकटन

**विषय** : विद्यापीठाचा १२६ वा पदवी प्रदान समारंभ : अर्ज करण्याचा कालावधी

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या १२६ व्या पदवीप्रदान समारंभाचे आयोजन दि. २९ सप्टेंबर, २०२५ करण्यात आले होते. १२६ व्या नियमित पदवी प्रदान (Regular Degree Convocation) लिंक दि. ०१ जुलै, २०२५ ते ३१ ऑगस्ट, २०२५ पर्यंत सुरू होती. परंतु त्याच दरम्यान एप्रिल/मे, २०२५ मध्ये परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांचे निकाल जाहीर होऊन त्यांच्यासाठी पुनर्मुल्यांकनाची लिंक सुध्दा सुरू होती. त्यामुळे पुनर्मुल्यांकन करून गुणांमध्ये वाढ होऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना नियमित ऑनलाईन लिंकमध्ये अर्ज करता आले नाहीत. सबब **एप्रिल/मे, २०२५ मध्ये फक्त पुनर्मुल्यांकनामध्ये उत्तीर्ण** झालेल्या विद्यार्थ्यांना पदवी/पदविका आणि पदव्युत्तर प्रमाणपत्रांसाठी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी खालीलप्रमाणे लिंक सुरू करण्यात येत आहे.

**ऑनलाईन अर्ज स्विकारण्याचा कालावधी —**

| | |
|---|---|
| **एप्रिल/मे, २०२५, मध्ये पुर्नमुल्यांकनात उत्तीर्ण** | दिनांक १७ ऑक्टोबर, २०२५ ते ३१ ऑक्टोबर, २०२५ |

उपरोक्त परीक्षांमध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या www.unipune.ac.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज व त्यासाठीचे शुल्क भरता येईल. पदवी/पदविका प्रमाणपत्र मिळण्याकरिता ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर विद्यार्थ्यांनी **अर्जासोबत मूळ गुणपत्रिका अपलोड** करणे आवश्यक आहे. पदवी प्रमाणपत्र विद्यार्थ्यांना पोस्टाद्वारे घरपोच प्राप्त होईल.

प्रभारी संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ